# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
## पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.


## दिनांक १०/०८/२०२४ (शनिवार) सायंकाळ

---

### लोखंड चोरी करणाऱ्या आरोपीविरूद्ध गुन्हा नोंद

दि. ०९/०८/२०२४ रोजी फिर्यादी हे डब्लू. सी. एल खदान नं. ०६ येथील सुरक्षा प्रहरी प्रभारी इंचार्ज असून त्यांना त्यांचे प्रतिबंधीत क्षेत्रात यातील **आरोपी नामे— विवेक शंकर शाहूँ, वय २३ वर्ष, रा. नाका नं. ०४ नर्मदानगर कलमना नागपूर** हा त्यांचे ताब्यातील १) टाटा एस वाहन क्र. एम. एच.—३१/सी क्यू— ७८३४ कि. ६०,०००/— रु. २) लोखंडी सळाखी वजन २०० कि.लो कि. ६,०००/—रु., ३) जुना वापरता इलेक्ट्रीक वजन काटा कि. १०००/— रु. असा एकुण ६७०००/— रू. चा मुद्देमाल चोरी करताना मिळून आल्याने पोस्टे कन्हान येथे आरोपीविरूद्ध कलम ३०३, (२) बीएनएस अन्वये गुन्हा नोंद केला आहे. सदर आरोपीस सुत्रचापत्रावर सोडण्यात आले आहे.

सदरची कार्यवाही ही मा. पोलीस अधीक्षक नागपूर ग्रामीण श्री. हर्ष ए. पोद्दार (भापोसे), मा. अपर पोलीस अधीक्षक श्री. रमेश धुमाळ यांचे मार्गदर्शनात पोस्टे कन्हान येथील ठाणेदार पोनि उमेश पाटील व त्यांचा स्टाफ यांनी पार पाडली.

पोलीस माहिती कक्ष
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर